<u>जलसंपदा विभाग (खुद्द) वाहनांचा आढावा.</u>

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र: वाहन-२०११/प्र.क्र.१६३/२०११ यांत्रिकी
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०८/०३ /२०१८

<u>वाचा</u> : शासन निर्णय वित्त विभाग क्र. वाहन १०००/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०.९.२००१

<u>प्रस्तावना</u> :

वित्त विभागाने त्यांच्या शासन निर्णय दिनांक १० सप्टेंबर,२००१ अन्वये शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनांच्या वापराबाबत धोरण निश्चित केले आहे. त्यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांचेकडील (प्रादेशिक कार्यालयासह) वाहनांचा आढावा घेण्याबाबत निर्देश दिले आहेत.सदर शासन निर्णयास अनुसरुन जलसंपदा विभाग (खुद्द) वाहनांबाबतचा आढावा घेण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

जलसंपदा विभाग (खुद्द) कार्यालयांच्या आस्थापनेवरील पदांकरीता वाहन सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने पुढीलप्रमाणे वाहन आढावा मंजूर केला आहे.

अ.क्र.	वाहन अनुज्ञेय आहे असे पदनाम	आढाव्या नुसार अनुज्ञेय वाहन संख्या
१	मा. मंत्री (जलसंपदा)	१ कार
२	मा. राज्यमंत्री (जलसंपदा)	१ कार
३	प्रधान सचिव (जलसंपदा)	१ कार
४	प्रधान सचिव (लाक्षेवि)	१ कार
५	स्टाफ कार	२ कार
	एकूण	६ कार

उपरोक्त वाहनांचे परिचलन, देखभाल व दुरुस्ती इ. कामे मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांच्यामार्फत करण्यात यावीत. जलसंपदा विभाग (खुद्द) कडे सध्या २८ वाहने कार्यरत आहेत. तथापि, विभागास ६ कार अनुज्ञेय असल्याने २२ वाहने अतिरिक्त ठरतात. सदर अतिरिक्त वाहने मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांचेकडे सोपविण्यात येत आहेत व जेथे आवश्यकता असेल / वाहने निर्लेखित करण्यात आली असतील त्या कार्यालयास सदर वाहने पुरविण्यात यावीत.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ५२/१६ विनियम, दि.१४.३.२०१६ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने व मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०९१३००५५०७२७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2018.03.09 13:02:52 +05'30'

(सं. रा. तिरमनवार)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. प्रधान सचिव (जलसंपदा विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
२. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय वाहन आढावा समिती.
५. सचिव (प्र.सु.व र.व.का.) सामान्य प्रशासन विभाग तथा सदस्य, राज्यस्तरीय वाहन आढावा समिती.
६. परिवहन आयुक्त, सदस्य सचिव, राज्यस्तरीय वाहन आढावा समिती.
७. सर्व सह सचिव, उप सचिव,अवर सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
८. सर्व कक्ष अधिकारी जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई-३२, यांना अधिनस्त कार्यालयांना अवगत करण्याच्या विनंतीसह.
९. मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग,नाशिक.
१०. कार्यकारी अभियंता,यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा, ठाणे.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य-१ व २, मुंबई/नागपूर.
१२. वित्त विभाग (कार्या-विनियम), मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती-यांत्रिकी.